# -:प्रेस नोट:-

## महात्मा ज्योतीबा फुले शिक्षण संस्था गिरगांव द्वारा संचालीत सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय गिरगांव, ता. नागभिड जि. चंद्रपूर येथील अध्यक्ष, सचिव व शिक्षीका यांचे विरूध्द अॅन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर ची कारवाई

महात्मा ज्योतीबा फुले शिक्षण संस्था गिरगांव द्वारा संचालीत सावित्रीबाई फुले विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय गिरगांव, ता. नागभिड जि. चंद्रपूर येथील १) श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले, वय ५२ वर्ष, सचिव, महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण संस्था गिरगांव व्दारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा ज्युनिअर कॉलेज गिरगाव, ता. नागभिड, जि. चंद्रपूर, २) सौ. मंगला मधुकर मोहुर्ले, वय–५० वर्षे, व्यवसाय– नौकरी, पद – शिक्षिका, महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण संस्था गिरगांव व्दारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा ज्युनिअर कॉलेज गिरगाव, ता. नागभिड, जि. चंद्रपूर ३) श्री. मोतीराम सखाराम मोहुर्ले, वय ७९ वर्ष, अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण संस्था गिरगांव व्दारा संचालित सावित्रीबाई फुले विद्यालय तथा ज्युनिअर कॉलेज गिरगाव, ता. नागभिड, जि. चंद्रपूर यांचे विरूध्द १२,०००,००/– रूपये मागणी करून १,५०,०००,/– रू. स्विकारल्या संबंधाने अॅन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज रोजी कार्यवाही केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार ही मौजा गिरगाव, ता. नागभिड, जि. चंद्रपूर येथील रहीवासी असुन शेतमजुरीचे काम करते. तक्रारदार हिचे पती हे मरण पावले असुन ते सावित्रीबाई फुले विद्यालय व ज्युनिअर कॉलेज गिरगाव मध्ये शिपाई सेवक म्हणुन कार्यरत होते. सावित्रीबाई फुले विद्यालय तथा ज्युनिअर कॉलेज गिरगाव येथे तक्रारदार हिच्या पतीच्या जागेवर अनुकंप तत्वावर तिचे मुलास शिपाई सेवक पदावर नोकरीवर लावले असुन त्या बदल्यात ईलोसे क्र. १ यांनी तक्रारदार यांच्याकडुन नोकरीवर नियुक्त दरम्यान साधारणत: एक वर्षापुर्वी एक लाख रूपयाची मागणी करून स्विकारले आहेत.

त्यानंतर ईलोसे क्र. १ यांनी दि. ३१/०३/२०२४ रोजी तक्रारदार यांना फोन करून तुमच्या मुलास प्राबेशन कालावधीत नोकरीवरून काढुन टाकायचे नसल्यास आणि प्रोबेशन पिरेड संपल्यानंतर शिपाई पदावर कायमस्वरूपी करण्याकरीता १२,००,०००/– रूपये लाच रक्कमेची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना ईलोसे श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले यांना लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील अधिकाऱ्यांना भेटुन दिनांक ०३/०४/२०२४ रोजी तक्रार नोंदविली.

प्राप्त तक्रारीवरून दिनांक ०३/०४/२०२४ व दि. ०४/०४/२०२४ रोजी पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत पाटील यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची गोपनीयरित्या शहानिशा करून पडताळणी/सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यामध्ये पडताळणी कार्यवाहीदरम्यान ईलोसे १) श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले, २) सौ. मंगला मधुकर मोहुर्ले, ३) श्री. मोतीराम सखाराम मोहुर्ले, यांनी तक्रारदार यांचे मुलास मुलास प्रोबेशन पिरेड संपल्यानंतर शिपाई पदावर कायमस्वरूपी करण्याचे कामाकरीता १२,००,०००/–रू लाचेची मागणी करून १,५०,०००/– रू. लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यावरून आज दि. ०८/०४/२०२४ रोजी ईलोसे श्री. मधुकर मोहुर्ले यांचे राहते घरी महाकाली वार्ड, सिंदेवाही येथे पंचासमक्ष सापळा कार्यवाही दरम्यान ईलोसे श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले यांनी १,५०,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारल्याने ईलोसे १) श्री. मधुकर मोतीराम मोहुर्ले यांना ताब्यात घेण्यात आले असुन पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. राहुल माकणीकर,पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र.वि. नागपूर तसेच श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक प्रशांत पाटील, पो.अ. वैभव गाडगे, अमोल सिडाम, म.पो.अ. पुष्पा काचोळे, चा.पो.अ. सतिश सिडाम, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांनी यशस्वी पार पाडली आहे. हॅश व्हॅल्यु घेण्यात आलेली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की,त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपूर दुरध्वनी क्रमांक :– ०७१२–२५६१५२०
  श्री. राहुल माकणीकर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
  श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर

- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक :– ०७१७२–२५०२५१
  टोल फ्रि क्रमांक :– १०६४
  श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :– ९३२२२५३३७२
  श्री. प्रशांत पाटील, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :– ९१३०५५६१६१
  श्री. जितेंद्र गुरनुले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :– ८८८८८५७१८४

**Website: www.acbmaharashtra.gov.in**